**प्रेसनोट** **दि.०९/०३/२०१९**

**सिंहगडरोड पो. ठाणे**

**महिला दिनानिमीत्त अभिरुची पोलीस चौकी हद्दीत महिलांना गुलाब पुष्पाचे वाटप करुन महिला दिनानिमीत्त शुभेच्छा व कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने मार्गदर्शन**

दि.०८/०३/२०१९ रोजी महिला दिनानिमीत्त सिंहगडरोड पोलीस ठाण्याचे अभिरुची पोलीस चौकीचे सहा.पोलीस निरीक्षक एच.एम.ननावरे, सहा.पोलीस निरीक्षक एस.आर.शिंदे, महिला पोलीस उप-निरीक्षक ए.टी.गायकवाड, मपोशि १०९२८ एन.एम. नळकांडे, मपोशि ९५१९ पी.पी.शिर्के यांनी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन सकाळी ११.३० वा. चे सुमारास धायरी गावातील ३० ते ३५ महिलांना व अभिरुची मॉल मधील ११ महिला सफाई कामगारांना बोलावुन घेवुन त्यांना जागतिक महिला दिनाचे महत्त्व सांगुन सदर महिलांना महिलांच्या हक्काबाबत व सुरक्षिततेबाबतची जाणीव करुन देवुन त्यांना कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने महिला, मुली यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन लैगींक अत्याचाराबाबतचे गुन्हे, छेडछाडी संदर्भात, ऑनलाईन फ्रॉड, तसेच महिला व मुलींना छेडछाड, संदर्भात काही अडचण आल्यास १०० नंबर वर कॉल केल्यास ५ ते १० मिनीटात दामिणी पथक, बिट मार्शल हे उपलब्ध होतात याबाबत मार्गदर्शन केले. तसेच महिला दिनानिमीत्त सदर महिलांना गुलाब पुष्पांचे वाटप करुन त्यांना महिला दिनाच्या शुभेच्या देण्यात आल्या. सदर वेळी महिलांसाठी चहा व नाष्टयाची उत्तम सोय महिला पोलीस उप-निरीक्षक ए.टी.गायकवाड व मपोशि १०९२८ एन.एम. नळकांडे, मपोशि ९५१९ पी.पी.शिर्के यांनी केली होती.

